Rotary
रोटरी क्लब लातूर

फक्त पत्रिकाच नव्हे, तर विचारांचा एक मंच जो समाजाला बदलण्याची क्षमता ठेवतो...

RID : 3132
CLUB NO. : 15520

# चक्रधर

अंक ५–६, डिसेंबर २०२५–जानेवारी–२०२६

UNITE FOR GOOD



रो. फ्रान्सेस्को अॅरेझ्झो
अध्यक्ष-रोटरी आंतरराष्ट्रीय
(२०२५-२६)



रो. सुधीर लातुरे
प्रांतपाल
- प्रांत ३१३२



रो. जकी खान कायमखानी
अध्यक्ष : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)



रो. विश्वनाथ निगुडगे
सचिव : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)

## सेवेतून समाधान आम्ही शोधतो, गरजवंतांसाठी सदैव धावतो
## ईश्वराचा तो आदेश आम्ही पाळतो, रोटरीच्या माध्यमातून मानवसेवा करतो.



रोटरी क्लबने लातूरच्या शासकीय दवाखान्यात अन्नदान उपक्रम राबवून रुग्ण, नातेवाईकांची सेवा केली.




अहिल्यानगर (अहमदनगर) येथे आयोजित रोटरी क्लबच्या कार्यक्रमात सहभागी रोटरी क्लब लातूरची टीम.



पानचिंचोली येथील संस्कार वर्धिनी विद्यालयात दंत चिकित्सा शिबीर घेण्यात आले.



पानचिंचोली येथील संस्कार वर्धिनी विद्यालयात परिसरातून येणाऱ्या मुलींसाठी शाळेत सायकल बँक स्थापन केली.

# सेवेच्या प्रकाशात उजळलेला रोटरी क्लब लातूर

प्रिय मित्रांनो,
सर्वप्रथम आपल्या क्लबचे सातत्याने नियत असलेल्या दर्जेदार बुलेटीन 'चक्रधर' साठी आपणास शुभेच्छा.



रोटरी क्लब लातूर हा गेल्या ५० वर्षांहून अधिक काळापासून समाजसेवेच्या माध्यमातून जो सातत्यपूर्ण, प्रभावी आणि प्रेरणादायी कार्यप्रवाह सुरू ठेवत आहे, त्याबद्दल मला मनापासून अत्यंत समाधान आणि अभिमान वाटतो. सेवा, नेतृत्व, शिस्त आणि मूल्याधिष्ठित कार्य यांचा सुंदर संगम म्हणजे रोटरी क्लब लातूर असे समीकरण आज संपूर्ण डिस्ट्रिक्टमध्ये दृढ झाले आहे. हा प्रवास केवळ काळाचा नाही, तर विश्वास, समर्पण आणि निः स्वार्थ सेवेचा आहे.

नुकतेच मेजर डोनर होण्याचा सन्मान मिळवलेले क्लब अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी यांचे मी विशेष अभिनंदन करतो. रोटरी फाउंडेशनसाठी केलेले त्यांचे योगदान हे केवळ आर्थिक मदत नसून, ते रोटरीच्या ध्येयधोरणांवरील दृढ निष्ठेचे आणि समाज परिवर्तनासाठी असलेल्या त्यांच्या व्यापक दृष्टीकोनाचे प्रतीक आहे. त्यांच्या या प्रेरणादायी कार्यामुळे अनेक सदस्यांना नक्कीच प्रेरणा मिळेल.

क्लबचे ज्येष्ठ सदस्य, माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांच्याविषयी गौरवोद्गार काढताना शब्द अपुरे पडतात. त्यांचे रोटरीमधील योगदान, नेतृत्व, अनुभवसंपन्न मार्गदर्शन आणि मूल्यनिष्ठ कार्यपद्धती ही संपूर्ण डिस्ट्रिक्टसाठी एक दीपस्तंभ आहे. अशा व्यक्तिमत्त्वामुळेच रोटरीची परंपरा अधिक समृद्ध आणि भक्कम बनते.

आता सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या रोटरी वर्षातील सुवर्णक्षण - रोटरी डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स कार्निव्हल, दिनांक २३, २४ व २५ जानेवारी, रविंद्र भवन, मडगाव, गोवा येथे आयोजित आहे. डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स म्हणजे प्रेरणा मिळविण्याची संधी, नवीन कल्पना आत्मसात करण्याचे व्यासपीठ, मैत्री, बंधुता आणि नेटवर्किंग वाढविण्याचा महोत्सव, आणि रोटरीचा खरा आत्मा अनुभवण्याचा सोहळा आहे. या कॉन्फरन्समधून प्रत्येक सदस्य अधिक ऊर्जावान, अधिक प्रेरित आणि अधिक सक्षम होऊन परततो.

आपल्या कार्निवल कॉन्फरन्समध्ये आपल्याला प्रेरणादायी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे Guest Speakers लाभले आहेत , जे त्यांच्या अनुभवातून नेतृत्व, सेवा, नवोन्मेष आणि यशाचे मंत्र आपल्यासमोर उलगडतील. त्यांचे विचार आपल्यातील रोटेरियनला नव्या उंचीवर घेऊन जाणारे असतील यात शंका नाही.

सोबतच खानपानाबाबत बोलायचे झाले तर, ही कॉन्फरन्स म्हणजे एक अविस्मरणीय Food Festival ठरणार आहे!

म्हणूनच मी आपणा सर्वांना आवर्जून आवाहन करतो की जास्तीत जास्त सदस्यांनी सहकुटुंब आपले रजिस्ट्रेशन करत उपस्थित राहावे.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे ही संपूर्ण डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स लातूर रोटरी परिवार होस्ट करत आहे. ही जबाबदारी म्हणजे आपल्यासाठी सन्मान असून, आपल्या सेवाभावी संस्कृतीचे आणि संघटन कौशल्याचे दर्शन संपूर्ण डिस्ट्रिक्टसमोर घडविण्याची सुवर्णसंधी आहे.

रोटरी क्लब लातूरच्या गौरवशाली परंपरेला साजेशा उत्साहाने, एकजुटीने आणि अभिमानाने आपण सर्वजण या कार्निव्हलमध्ये सहभागी व्हावे आणि रोटरीचा गौरव अधिक उंच करावा असे मी आपणास आवाहन करतो.

रोटरी क्लब लातूरच्या उज्ज्वल वाटचालीस परत एकदा मनःपूर्वक शुभेच्छा!

- रो. सुधीर लातुरे
डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२

## रोटरी क्लबतर्फे डेंटल चेकअप व टूथब्रश वाटप शिबीर

लातूर : निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व जि.प.प्रा. कन्या शाळेत रोटरी क्लब लातूरतर्फे २४ डिसेंबर रोजी डेंटर चेकअप करून व टूथपेस्ट आणि टूथ ब्रशचे वाटप करण्यात आले. या शिबिरात स्वच्छता व आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी, सचिव रो. विश्वनाथ निगुडगे, प्रकल्प प्रमुख डॉ. स्नेहल तारे (पेंसलवार), रो. प्रविण होळीकर उपस्थित होते. यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.











# चार सूत्रे, एक मूल्यधारा




आजच्या या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे गव्हर्नर रो. सुधीरजी लातूरे, फर्स्ट लेडी सौ. संगीता लातूरे, असिस्टंट गव्हर्नर रो. रविशंकरजी हिंगणे, क्लब सेक्रेटरी रो. विश्वनाथ निगुडगे, रोटरी सॅटेलाईट क्लबच्या चेअरपर्सन सौ. कौशल्याताई सोनकवडे, सॅटेलाईट क्लब सेक्रेटरी सौ. वनिता लघुरिया, प्रोजेक्ट चेअरमन रो. डॉ. आसिफ शेख तसेच उपस्थित सर्व रोटेरियन्स, ॲन्स आणि किड्स यांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

आज आपण येथे फोर-वे टेस्ट प्रमोशन या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी एकत्र आलो आहोत. फोर-वे टेस्टबाबत मला जे स्वतः अनुभवायला मिळाले, ते आज मी आपल्यासमोर मांडू इच्छितो.



मी बेंगळुरू येथे डिस्कव्हर युवरसेल्फ हा दहा दिवसांचा कोर्स केला होता. त्या कोर्सच्या सुरुवातीला आमच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यामध्ये आपण काय विचार करतो, समाजासाठी काय करायचे आहे, यावर चर्चा झाली. तेव्हा एक अतिशय सुंदर उदाहरण आम्हाला देण्यात आले.

एखाद्या शहरात आपण कोणाला भेटायला गेलो आणि त्या व्यक्तीचा पत्ता किंवा लोकेशन आपल्या जवळ नसेल, तर त्या व्यक्तीपर्यंत पोहोचणे किती कठीण होते! त्याचप्रमाणे, जर आपण स्वतःला ओळखले नाही, तर आपल्या ध्येयापर्यंत, उद्दिष्टांपर्यंत पोहोचणेही तितकेच अवघड होते.

त्या दहा दिवसांत दररोज जगाकडे पाहण्याचा, विचार करण्याचा नवा दृष्टिकोन शिकवण्यात आला. त्या सर्व शिक्षणाचा सारांश म्हणजेच फोर-वे टेस्ट होय.

जेव्हा आपण फोर-वे टेस्ट पूर्णतः आत्मसात करतो, तेव्हा ती वेगळी लक्षात ठेवण्याची गरज राहत नाही, कारण जी गोष्ट आपल्या मनात आणि विचारात कायमस्वरूपी रुजते, ती विसरली जात नाही. फोर-वे टेस्ट अशीच आपल्या विचारसरणीचा भाग बनली पाहिजे.

ईश्वराने संपूर्ण विश्व निर्माण केले, सौरमंडळ, आकाशगंगा, असंख्य ग्रह तयार केले. या सर्वांचे आकलन करण्याची क्षमता फक्त मानवाला दिली आहे. सिंह शक्तिशाली असतो, पण त्याला सागराची खोली कळत नाही. हत्ती विशाल असतो, पण त्याची बुद्धी मर्यादित असते. परंतु मानवी मेंदू हे संपूर्ण सृष्टीतील सर्वात मोठे अद्भुत रहस्य आहे.

याच मानवी मेंदूबाबत जोसेफ मर्फी यांचे The Power of Subconscious Mind हे पुस्तक प्रसिद्ध आहे. त्यामध्ये सांगितले आहे की मानवी मेंदूचे दोन भाग असतात – कॉन्शस माइंड (सचेत मन) आणि सबकॉन्शस माइंड (अवचेतन मन).

सचेत मन, दैनंदिन विचार व कृती नियंत्रित करते, तर अवचेतन मन चोवीस तास कार्यरत असते.

उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती समाजात नैतिकतेच्या, प्रामाणिकपणाच्या गप्पा मारते; पण वैयक्तिक आयुष्यात भ्रष्टाचार, गैरप्रवृत्ती किंवा अन्याय करत असेल, तर त्याचे अवचेतन मन त्या सवयीच अधिक बळकट करते. झोपेतही अशाच नकारात्मक कल्पना त्याच्या मनात रुजतात.

याउलट, जो व्यक्ती सार्वजनिक जीवनात आणि खासगी आयुष्यातही प्रामाणिक, सत्यनिष्ठ आणि सदाचारी असतो, त्याच्या अवचेतन मनातून समाजासाठी सकारात्मक, विधायक विचार जन्म घेतात.

जर आपल्या मनात एखादा वाईट अनुभव साठवला गेला असेल, तर तो विसरला गेला तरी अवचेतन मनात राहतो. त्यामुळे तो तिथून काढून टाकणे आवश्यक असते. याबाबत शिव खेड़ा यांच्या सन्मानाने जगा या पुस्तकातील एक कथा मला सांगावीशी वाटते. एका गावात दोन सख्खे भाऊ राहत होते. एक भाऊ दारूडा, पत्नी व मुलांना मारहाण करणारा, समाजात बदनाम होता. दुसरा भाऊ मात्र कुटुंबवत्सल, सभ्य व सन्मानाने जीवन जगणारा होता.

दोघेही एकाच घरात वाढले असतानाही इतका फरक का, असे लोकांना वाटले. दारूड्या भावाने सांगितले, मी जे पाहिले, तेच शिकलो. तर चांगल्या भावाने सांगितले, वडिलांचे वर्तन पाहून मी ठरवले की मला असे कधीच व्हायचे नाही. ही कथा आपल्याला शिकवते की वाईट गोष्टी अवचेतन मनातून काढून टाकून, मी असे करणार नाही हा ठाम निश्चय केला पाहिजे. म्हणूनच फोर-वे टेस्ट केवळ वाचण्यासाठी नसून, ती आपल्या अवचेतन मनात रुजली पाहिजे. तेव्हाच रोटरीत आणि आयुष्यात आपल्याला यश मिळेल.

फोर-वे टेस्ट ही रोटरीची मार्गदर्शक ज्योत आहे. १९३२ मध्ये रोटेरियन हर्बर्ट जे. टेलर यांनी ही चार सूत्रांची कसोटी मांडली. ही केवळ शब्दांची माळ नसून, एक सार्वत्रिक नैतिक मार्गदर्शक तत्त्व आहे.

**फोर-वे टेस्ट शिकवते की -**
**सत्यातून विश्वास निर्माण होतो**
**न्यायातून समतोल निर्माण होतो**
**सद्भावनेतून सौहार्द वाढते**

सर्वांच्या हितातून खरी प्रगती साध्य होते जर आपण विचार, शब्द आणि कृती या तिन्ही स्तरांवर फोर-वे टेस्ट अंगीकारली, तर आपले कुटुंब, व्यवसाय, समाज आणि राष्ट्र निश्चितच उजळेल. चला, आपण सर्व रोटेरियन आज संकल्प करूया की फोर-वे टेस्ट केवळ उच्चारू नाही, तर ती जगू, आचरणात आणू आणि सर्वत्र प्रसारित करू.

**- रो. जकी खान कायमखानी**
**अध्यक्ष,**
**रोटरी क्लब लातूर.**

# रोटरी क्लब लातूरने शिरूरच्या शाळेत ‘सायकल बँक’ उभारली

## विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करावेत





लातूर : निलंगा तालुक्यातील शिरूर (वा.) येथील संस्कारवर्धिनी माध्यमिक विद्यालयात रोटरी क्लब लातूरच्या वतीने २३ डिसेंबर रोजी ‘सायकल बँक’ स्थापन केली. शिक्षणासाठी विद्यार्थिनींना मदत करणारा हा उपक्रम रोटरीने यशस्वीपणे राबवित विद्यालयात पाच सायकलींची बँक स्थापन केली. या सायकली शाळेकडून गरजू विद्यार्थिनींची निवड करून त्यांना एक वर्षासाठी वापरण्यासाठी दिल्या जाणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक कांबळे होते. मंचावर रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकीखान कायमखानी, सचिव रो. विश्वनाथ निगुडगे, रो. अनिल थोरमोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सायकल बँक प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख रो. डॉ. विनोद लड्डा यांनी, तर सह-प्रकल्प प्रमुख ॲड. जांबुवंतराव सोनकवडे यांनी यावेळी महत्वाची भूमिका बजावली. या उपक्रमासाठी मुंबई येथील जयचंडी चॅरिटेबल ट्रस्ट, हैदराबाद येथील डॉ. रजनी अय्यर तसेच उदगीर येथील ॲड. डॉ. विजयकुमार बिराजदार यांचे मोलाचे योगदान लाभले.

यावेळी कार्यक्रमास संबोधित करताना अध्यक्ष जकी कायमखानी म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच पर्यावरण संवर्धनासाठीही प्रयत्नशील राहावे. वृक्ष ही जीवनवाहिनी आहेत. त्यांचे संवर्धन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सायकल बँक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहुलत निर्माण करून देणारा आहे. या माध्यमातून अनेक गरजवंत विद्यार्थीनींना शाळेत येण्यासाठी मदत होणार आहे. सूत्रसंचालन शेळके सर यांनी केले. आभार प्रदर्शन हंगरगे सर यांनी मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य जाधव यांच्यासह पालक शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# रोटरी क्लब लातूरची अन्नसेवा

लातूर : शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १ डिसेंबर रोजी रोटरी क्लब लातूर तर्फे अन्नसेवेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने रूग्ण व नातेवाईकांनी लाभ घेतला. रोटरीच्या अन्नसेवेचे सर्वत्र कौतुक झाले.















# रोटरी क्लब लातूरतर्फे फोर-वे टेस्ट प्रोमोशनचा प्रभावी उपक्रम

लातूर : रोटरी क्लब लातूरच्या वतीने शुक्रवार, ९ जानेवारी रोजी फोर-वे टेस्ट प्रोमोशन या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या बैठकीचा मुख्य उद्देश रोटरी चळवळीच्या मूलभूत मूल्यांपैकी एक असलेल्या फोर-वे टेस्टचा प्रचार व प्रसार करणे हा होता. कार्यक्रमाचे उद्घाटन रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो. सुधीरजी लातुरे यांच्या शुभहस्ते पार पडले.

या प्रसंगी व्यासपीठावर असिस्टंट गव्हर्नर रो. रविशंकर हिंगणे, क्लबचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी, सेक्रेटरी रो. विश्वनाथ निगुडगे, रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ अस्पिरेशनच्या चेअरपर्सन सौ. कौशल्या सोनकवडे, सेक्रेटरी श्रीमती वनिता लचुरिया तसेच प्रोजेक्ट चेअरमन रो. डॉ. आसिफ शेख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्लब अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी यांनी प्रस्तावना करून केली. त्यांनी फोर-वे टेस्टची संकल्पना, तिचा इतिहास आणि वैयक्तिक व सामाजिक जीवनातील महत्त्व सविस्तरपणे विशद केले.

यानंतर प्रांतपाल रो. सुधीरजी लातुरे यांनी उपस्थितांना फोर-वे टेस्टचे सखोल मार्गदर्शन केले. सत्य, न्याय, सद्भावना आणि सर्वांसाठी हित या चार तत्वांवर आधारित ही चाचणी रोटरी कार्यात कशी मार्गदर्शक ठरते, हे त्यांनी प्रभावी उदाहरणांसह स्पष्ट केले. याचबरोबर त्यांनी गोव्यात होणाऱ्या आगामी कार्निव्हल कॉन्फरन्सची माहिती दिली आणि रोटरी फाउंडेशन (TRF) साठी अधिकाधिक योगदान देण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात क्लब अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी हे वन टाईम मेजर डोनर बनल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच टीआरएफमध्ये योगदान देणाऱ्या इतर सदस्यांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी फेलोशिपचा आनंद घेतला आणि बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. यावेळी रो. नंदकिशोर जी अग्रवाल, रो. हरिप्रसाद सोमाणी, रो. बाबुराव सोमवंशी, रो. ब्रह्मकुमार सुवर्णकार, रो. सुरेश पेन्सलवार, रो. आजम गोलंदाज, रो. प्रवीण होळीकर, रो. बसवराज उटगे, रो. संदीप नवटक्के, रो. नानिक जोधवानी, रो. मनोज पाटील, रो. नरेश कोरे, रो. रामप्रसाद राठी, रो. मोहन परदेशी, रो. सतीश दिवाण, रो. सुनील कोचटा, रो. अनिल थोरमोटे, रो. सतीश बोरा, रो. जांबुवंतराव सोनकवडे, रो. अनिरुद्ध मुचळंबकर, रो. विक्रमसिंह जाधव, रो. हर्षद राजूरकर, रो. प्रवीण होळीकर, रो. डॉ. संदिपान जगदाळे, रो. दिलीप नागरगोजे, रो. उमाकांत पेन्सलवार, रो. राजकुमार गिरवलकर, रो. सुशांत कुलकर्णी तसेच फर्स्ट लेडी रो. सौ. संगीता लातूरे, सौ. निर्मला सोमाणी, सॅटेलाईट क्लबच्या चेअरपर्सन रो. सौ. कौशल्या सोनकवडे, रो. श्रीमती वनिता लचुरिया, रो. सौ. मैना कावळे, रो. सौ. अर्चना होळीकर, रो. सौ. आरती कुलकर्णी, रो. सौ. वर्षा पेन्सलवार, रो. सौ. संगीता बोरा, रो. सौ. मधुमती सुवर्णकार, सौ. थोरमोटे, सौ. मुचळंबकर, सौ. संगीता गिरवलकर, सौ. नवटक्के आदींची उपस्थिती होती.











रोटरी क्लब लातूरतर्फे फोर-वे टेस्ट प्रोमोशनप्रसंगी स्वागत, सत्कार व उद्घाटनप्रसंगीचे छायाचित्रे. याप्रसंगी रोटरीयन्सच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहतानाचे नयनरम्य दृश्य.

# मतदान जनजागृतीसाठी लातूर रोटरी परिवाराचा एकत्रित पुढाकार

लातूर : लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी मतदानाबाबत जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. याच उद्देशाने लातूर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने रोटरी क्लब लातूरला मतदान जनजागृती कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार लातूर रोटरी परिवाराने या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवण्याची तयारी दर्शविली आहे.

महानगरपालिका प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संकुल ते टाउन हॉल या मार्गावर पायी रॅली अर्थात वॉक्याथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून लोकशाहीचा उत्सव – मतदान हे आपले कर्तव्य हा संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला गेला. रोटरी क्लब नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांमध्ये अग्रभागी असतो आणि याच परंपरेनुसार या मतदान जनजागृती रॅलीतही रोटरी परिवार एकजुटीने सहभाग घेतला.

रॅलीदरम्यान सर्वांनी आवर्जून रोटरीचा टी-शर्ट परिधान केला होता. यामुळे रोटरीची एकसंध ओळख आणि सामाजिक संदेश अधिक प्रभावीपणे दिसून आला. या उपक्रमासाठी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकी खान, रोटरी क्लब लातूर होरायझनचे रो. गुणवंत बिरादार, रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे रो. बाळासाहेब खैरे, रोटरी क्लब लातूर मेट्रोचे रो. राहुल धरणे, रोटरी क्लब लातूर श्रेयसचे रो. शिवराज मिसाळ तसेच रोटरी क्लब लातूर मिडटाऊनचे रो. अमोल दाडगे यांनी संयुक्तपणे सर्व रोटरी सदस्यांना सहभागी होण्याचे आवाहन केले होते. लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग हा प्रत्येक सुजाण नागरिकाचा अधिकार आणि कर्तव्य आहे. रोटरी परिवाराच्या या पायी रॅलीमुळे शहरात मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले.









## रोटरी क्लब लातूरच्या २६ व्या साप्ताहिक बैठकीतील काही क्षणचित्रे...












# रोटरी क्लब लातूरने विद्यार्थ्यांना दंत आरोग्याचे दिले धडे

## संस्मरणीय क्षण : जि.प.प्रा.शाळा महमदापूर शाळेत विद्यार्थ्यांना टूथ पेस्ट व ब्रशचे केले वाटप




लातूर : रोटरी क्लब लातूर तर्फे लातूर शहरासह जिल्ह्यातील अनेक शाळांत रोटरी क्लब लातूरच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीराम नगर, महमदापूर येथे दंत आरोग्य जागरूकता शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक सवयी सुधाराव्यात, दंत स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि लहान वयापासून योग्य सवयींचा अंगीकार व्हावा, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश होता.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बेदरे सर, श्री. शिंदे सर, सर्व आदरणीय शिक्षकवृंद तसेच शाळेतील सहकारी कर्मचारी यांनी मनःपूर्वक सहकार्य केले. शाळेचा परिसर स्वच्छ, शिस्तबद्ध व विद्यार्थ्यांसाठी अत्यंत पोषक असल्याचे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उपक्रमात उत्साहाने भाग घेतला.

शिबिरात विद्यार्थ्यांना मोफत टूथब्रश व टूथपेस्टचे वितरण करण्यात आले. तसेच दंत आरोग्याचे महत्त्व, रोजच्या जीवनातील स्वच्छतेच्या सवयी, योग्य पद्धतीने दात घासणे, गोड पदार्थांचे मर्यादित सेवन आणि दातांची नियमित तपासणी का आवश्यक आहे, याबाबत सोप्या व समजण्यासारख्या शब्दांत मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये दंत आरोग्याविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला.

या कार्यक्रमात रोटरी क्लब लातूरच्या वतीने प्रमुख अतिथी म्हणून रो. मोहन परदेशी, प्रकल्प अध्यक्ष रो. अनिल थोरमोटे, क्लब अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी तसेच सचिव रो. विश्वनाथ निगुडगे हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना आरोग्यदायी सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. हा दंत आरोग्य शिबिर विद्यार्थ्यांच्या आरोग्यदृष्ट्या निश्चितच लाभदायक ठरला असून, शाळेच्या उत्तम सहकार्यामुळे कार्यक्रम अतिशय सुरळीत व यशस्वीपणे पार पडला. रोटरी क्लब लातूरतर्फे सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. सेवा, शिस्त आणि संस्कार– हीच खरी शाळेची ओळख असून, ती या उपक्रमातून ठळकपणे दिसून आली.

# रोटरी क्लब लातूरची २६ वी साप्ताहिक बैठक उत्साहात संपन्न

लातूर : रोटरी क्लब लातूरतर्फे रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी रोटरी हॉल, लातूर येथे २६ वी साप्ताहिक बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीस एकूण ४१ सदस्य उपस्थित होते. सकाळी ९.०० ते ९.३० या वेळेत फेलोशिप घेण्यात आली. या फेलोशिपदरम्यान रोटेरियन सदस्यांमध्ये आपुलकी, संवाद आणि स्नेहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. त्यानंतर ९.३० ते १०.३० या वेळेत औपचारिक बैठक पार पडली.

बैठकीच्या सुरुवातीला दिलीप नागरगोजे यांनी फोर–वे टेस्टचे वाचन केले. त्यानंतर सचिव रो. विश्वनाथ निगुडगे यांनी मागील बैठकीचा सविस्तर वृत्तांत सादर केला तसेच मागील महिन्यात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक प्रकल्पांची माहिती दिली. जिल्हा परिषद शाळा क्रमांक ९ येथे राबविण्यात आलेल्या पाणी प्रकल्पाबाबत डॉ. उमाकांत पाचेगावकर यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच श्रीराम नगर, महमदापूर येथील शाळेत झालेल्या दंतरोग शिबिराविषयी रो. अनिल थोरमोटे यांनी, तर रक्तदान शिबिराबाबत रो. हर्षद राजूरकर यांनी आपले अनुभव मांडले. विशेष म्हणजे या शिबिरात रो. हर्षद राजूरकर यांनी स्वतः रक्तदान केल्याबद्दल सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

या बैठकीस प्रमुख अतिथी म्हणून युनिटी अर्बन क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन अबरार मोहसिन आणि डायरेक्टर शेख इक्राम उपस्थित होते. अबरार मोहसिन यांनी मायक्रोफायनान्स व्यवस्थेवर आणि व्याजमुक्त बँकिंग या विषयावर प्रभावी पीपीटी सादरीकरण केले. व्याजाच्या ओझ्यामुळे शेतकरी कशा प्रकारे अडचणीत सापडतात आणि व्याजमुक्त आर्थिक पर्याय समाजासाठी किती उपयुक्त ठरू शकतात, याबाबत त्यांनी सखोल माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल त्यांना मोमेंटो देऊन सन्मानित करण्यात आले.

बैठकीच्या शेवटी आगामी प्रकल्पांची माहिती देण्यात आली. ९ जानेवारी रोजी संध्याकाळी ७ वाजता डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीरजी लातूरे यांच्या हस्ते फोर–वे टेस्ट प्रचार कार्यक्रमाचे आयोजन असल्याचे जाहीर करण्यात आले. सभागृहात सर्वप्रथम उपस्थित राहिलेले अनिरुद्ध मुचळंबकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच आजचे मॅन ऑफ द मीटिंग म्हणून रो. प्रसाद राठी यांची घोषणा करण्यात आली. राष्ट्रगीताने बैठक यशस्वीरित्या संपन्न झाली.











## अहिल्यानगर (अहमदनगर) येथील टीआरएफ कार्यक्रमात लातूर रोटरी क्लब पदाधिकारी









## रोटरी क्लब लातूर तर्फे शिरूर अनंतपाळ येथील शिबीरात ३५ जणांचे रक्तदान

शिरूर अनंतपाळ : समाजासाठी निस्वार्थ सेवाभावाचे जिवंत उदाहरण ठरलेले प्राचार्य हर्षद राजूरकर यांनी आपल्या जीवनातील ६२ व्या वेळी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिरूर अनंतपाळ येथे रोटरी क्लब ऑफ लातूर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर यांच्या सौजन्याने व सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले. या रक्तदान शिबिरात संस्थेतील २८ प्रशिक्षणार्थी व ७ कर्मचारी असे एकूण ३५ जणांनी रक्तदान केले. यावेळी संस्थेचे प्राचार्य हर्षद राजूरकर यांनी तब्बल ६२ व्या वेळी रक्तदान केले. सदर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्राचार्य हर्षद राजूरकर यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत असून त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे समाजाला नवी दिशा मिळत आहे.







